मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# आयुक्तांनी साधला विद्यार्थ्यांशी संवाद

## 'व्हिजन@50' उपक्रम; कार्यशाळेत शिक्षण क्षेत्रातील विविध विषयांवर झाले विचारमंथन

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी चिंचवड महापालिका स्थापनेस २०३२ मध्ये ५० वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्ताने महापालिकेने 'व्हिजन@५० शहर धोरण' हा उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमांतर्गत शिक्षण विभागासाठी पुढील पाच वर्षांचा धोरणात्मक आराखडा तयार करण्याच्या अनुषंगाने विचारमंथन करण्यासाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेमध्ये महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांनी देखील सहभागी होऊन आपले मत मांडले.

पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या संकल्पनेतून 'व्हिजन@५० शहर धोरण' हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. या अंतर्गत विविध क्षेत्रातील व्यक्तींशी चर्चा करण्यात येत आहे. शहराचा विकास करताना प्राधान्यक्रम कोणत्या गोष्टींना द्यावा? कोणत्या क्षेत्रांना महत्त्व द्यावे? येथील शिक्षण व्यवस्था कशी असावी? पर्यावरण उत्तम राहावे यासाठी काय उपाययोजना कराव्यात? अशा विविध विषयांवर चर्चा करण्यासाठी या उपक्रमांतर्गत वेगवेगळ्या क्षेत्रातील व्यक्तींच्या कार्यशाळा आयोजित केल्या जात आहेत. त्याच अनुषंगाने आज महापालिका आयुक्त शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेला सहाय्यक आयुक्त किरणकुमार मोरे, प्रशासन अधिकारी संगीता बांगर,



प्रथम या संस्थेच्या सह संस्थापक रजिया फरीदा यांच्यासह आकांक्षा फाउंडेशन, सत्त्वा कन्सल्टिंग, संगात, किंडर स्पोर्ट्स, क्वालिटी कौन्सिल ऑफ इंडिया, लीडरशिप इक्विटी, पाय जाम फाउंडेशन, टीच फॉर इंडिया, लेंड अँड हँड, युनिसेफ अशा विविध संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

या कार्यशाळेत पिंपरी-चिंचवड शहरातील शिक्षण क्षेत्राचा सविस्तर आढावा घेऊन, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचे डेटा-आधारित विश्लेषण, शालेय बाह्य मुले, शाळांमध्ये राबविलेल्या सर्वोत्तम पद्धतींचे सादरीकरण आणि राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय शिक्षण व्यवस्थेतील यशस्वी पद्धती, शिक्षण विभागासाठी प्राधान्यक्रम निश्चित करणे, या क्षेत्रातील नवीन आव्हाने यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. विशेष म्हणजे, महापालिकेतील पाच विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेत सहभागी होऊन त्यांच्या शालेय जीवनातील अनुभव आणि भविष्यात शाळांमध्ये पाहायला आवडणारे बदल याबाबत मते व्यक्त केली. डिजिटल साधनांचा वापर वाढवणे, शिक्षक-विद्यार्थी संवाद अधिक प्रभावी करणे, क्रीडा व सर्जनशील उपक्रमांना अधिक महत्त्व देणे, आणि मानसिक आरोग्यावर लक्ष केंद्रित करण्याची आवश्यकता यांसारख्या मुद्द्यांवर विद्यार्थ्यांनी भर दिला.कार्यशाळेतून आलेल्या सूचनांच्या आधारे शिक्षण विभागासाठी सर्वसमावेशक, विद्यार्थी-केंद्रित आणि दूरदर्शी धोरणात्मक आराखडा तयार केला जाणार असून, यामुळे पुढील पाच वर्षांत पिंपरी-चिंचवड शहरातील शिक्षण क्षेत्रात एक आदर्श उभा राहील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

> पिंपरी चिंचवड शहरातील प्रत्येक विद्यार्थ्याला गुणवत्तापूर्ण, समावेशक शिक्षण मिळावे, हा आमचा मुख्य उद्देश आहे. या धोरणात्मक आराखड्याद्वारे आम्ही फक्त शाळा सुधारत नाही, तर संपूर्ण शिक्षण संस्कृतीत बदल घडवून आणण्याचा प्रयत्न करत आहोत. विद्यार्थ्यांच्या गरजा, शिक्षकांचे योगदान आणि समाजाची अपेक्षा लक्षात घेऊन तयार होणारा हा आराखडा पुढील पाच वर्षांत शहराच्या शिक्षण क्षेत्राला नवी दिशा देईल.
>
> **- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महापालिका.**

# वीजपुरवठा खंडित होऊ देऊ नका, प्रलंबित कामांना गती द्या

## शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांच्या महावितरणच्या अधिकाऱ्यांना सूचना

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी चिंचवड शहरातील आकुर्डी, काळभोरनगर, मोहननगर, दत्तवाडी परिसरातील वीजपुरवठा खंडित होत असल्याच्या तक्रारींमध्ये वाढ झाली आहे. या भागातील वीज पुरवठा तत्काळ सुरळित करावा. नवरात्र उत्सव सुरु आहे. दसरा, दिवाळी सण जवळ आले आहेत. त्यामुळे सणासुदीच्या काळात वीजपुरवठा खंडित होणार नाही, याची खबरदारी घ्यावी. महावितरणच्या सुरु असलेल्या, प्रलंबित कामांना गती देण्याचे आदेश शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांना दिले.

महावितरण विद्युत वितरण कंपनीच्या पिंपरी-चिंचवड विभागातील वीज प्रश्नांचा खासदार बारणे यांनी बुधवारी आढावा घेतला. यावेळी पुणे परिमंडळाचे मुख्य अभियंता सुनील काकडे, गणेश खिंड परिमंडळाचे अधीक्षक अभियंता शहाजी गायकवाड, कार्यकारी अभियंता सोमनाथ मुंडे, अतुल देवकर, शिवसेनेचे महानगरप्रमुख राजेश वाबळे, शहरप्रमुख निलेश तरस, माजी नगरसेवक प्रमोद कुटे, संतोष सौंदणकर उपस्थित होते.

पिंपरी, चिंचवडमध्ये महावितरणची सुरु असलेली कामे, ताथवडेतील अतिउच्चदाब सब



स्टेशन, आरडीएस, एसआयडीबीआय योजना, एएससी, एनपीएसएस, पीएम सूर्यघर योजना, जिल्हा नियोजन समितीमधून सुरु असलेल्या कामांचा खासदार बारणे यांनी आढावा घेतला.

खासदार बारणे म्हणाले, शहरातील काही भागात सातत्याने वीजपुरवठा खंडित होत आहे. महावितरणचे अधिकारी फोन उचलत नाहीत. नागरिकांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करतात. या अधिकाऱ्यांना तत्काळ समज द्यावी. नागरिकांचे फोन उचलून वीजपुरवठ्या संदर्भातील तक्रारी निकाल्या काढाव्यात. आगामी सण, उत्सवांमध्ये वीजपुरवठा खंडित होणार नाही, याची खबरदारी घेण्याचे निर्देश खासदार बारणे यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांना दिले.

### पिंपरी, वाल्हेकरवाडीत रोहित्र वाढणार..

» एसआयडीबीआय योजनेअंतर्गत २२ केव्ही क्षमतेच्या एमएचटी केबल, रिंग मेन युनिट टाकण्याचे काम सुरु आहे. सद्यस्थितीत असणाऱ्या २२ केव्ही फिडरचे विभाजन करुन वाल्हेकरवाडी शाखेत १६ आणि पिंपरी शाखेत २६ रोहित्र कार्यान्वित होणार आहेत. त्यामुळे पिंपरी मार्केट, विजयनगर, कोकणेनगर, तापकीरमळा, नढेनगर, राजेवाडेनगर, काळेवाडी या भागातील वीजपुरवठा खंडीत होण्याचे प्रमाण कमी होणार आहे. ताथवडे शाखेतील प्रिशटाईन प्रोलाइफ या उपकेंद्राला ३.५ किमी केबल आणि ७ रिंग मेन युनिट असे दोन कोटी २७ लाख रुपयांचे काम मंजूर झाले आहे. या कामामुळे वाकड भागातील विद्युत पुरवठा खंडित होण्याचे प्रमाण कमी होईल, असे खासदार बारणे यांनी सांगितले.

# महापालिका शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी आता "बालसंस्कार"

## आमदार लांडगे यांची प्रशासनाला सूचना; राष्ट्रीय शिक्षण धोरणाची होणार प्रभावी अंमलबजावणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील शाळांमधील विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक, बौद्धिक आणि सामाजिक विकासासाठी राष्ट्रीय शिक्षण धोरणाची प्रभावीपणे अंमलबजाणवी करण्यात येणार आहे.तसेच, गीता परिवार यांच्या वतीने शाळांमध्ये बालसंस्कार वर्ग होणार आहेत.

भाजपा आमदार महेश लांडगे यांनी याबाबत महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांना निवेदनाद्वारे मागणी केली होती. त्याला प्रशासनाला सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.



> विद्यार्थ्यांचे मानसिक स्वास्थ्य उत्तम राखणे. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक, भावनिक कौशल्ये विकसित करणे, शालेय स्तरावर ताणतणावाचे व्यवस्थापन करण्यासाठी विद्यार्थ्यांना सक्षम बनविणे, विद्यार्थ्यांमध्ये संभाषण कौशल्य विकसित करणे आणि विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास व नैराश्येवर मात करण्याची क्षमता निर्माण करणे यासाठी शिक्षणासोबतच बालसंस्कारांची आवश्यकता आहे. त्या अनुशंगाने प्रशासनाला सूचना केली आहे. त्यावर सकारात्मक कार्यवाही केली जाईल, असे आश्वासन प्रशासनाने दिले आहे.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

आमदार लांडगे म्हणाले की, विद्यार्थ्यांना एक सक्षम आणि जबाबदार नागरिक म्हणून घडविणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 (NEP 2020) मधील "बॅगलेस शनिवार" या संकल्पनेच्या अंमलबजावणीसाठी गीता परिवाराच्या माध्यमातून प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांना प्रभावी प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. "शिक्षकांना विविध कार्यशाळा आणि प्रशिक्षण देऊन त्यांना विद्यार्थ्यांवर सकारात्मक प्रभाव टाकण्यासाठी सक्षम करणे महत्त्वाचे आहे. यासाठी गीता परिवारचे प्रशिक्षण कार्यक्रम उपयुक्त ठरू शकतात. या कार्यक्रमांमध्ये योगसोपान, सूर्यनमस्कार, प्रज्ञासंवर्धन, स्वच्छता अभियान, विज्ञान प्रयोग इत्यादी बाबींचा समावेश केला जाऊ शकतो. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधता येईल आणि शाळांमध्ये शिक्षणाची गुणवत्ता सुधारेल.

वास्तविक, तर्कसंगत विचार आणि कार्य करण्यासाठी सक्षम असणाऱ्या तसेच करुणा, सहानुभूती, साहस, लवचिकता, वैज्ञानिक चिंतन, रचनात्मक कल्पनाशक्ती, नैतिक मूल्य असणाऱ्या उत्तम मनुष्यत्वाचा विकास हा नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा महत्वाचा उद्देश आहे. सध्याच्या काळात लहान वयातही विद्यार्थ्यांना ताण तणाव, उदासीनता, नैराश्य या मानसिक विकारांना सामोरे जावे लागत आहे. या सर्व पार्श्वभूमीवर शालेय जीवनात आनंददायी कृती असण्याची गरज प्रकर्षाने जाणवते. यानुसंगाने "आनंददायी शनिवार" हा उपक्रम राज्य मंडळाच्या सर्व शाळामध्ये इयत्ता १ ली ते ८ वी या इयत्तांसाठी राबविल्यास विद्यार्थ्यांची शिक्षणाची अभिरुची वाढीस लागेल, त्याचा निश्चितच विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर चांगला परिणाम होईल. तसेच विद्यार्थ्यांच्या गळती व अनुत्तीर्ण होण्याचे प्रमाण कमी होईल, विद्यार्थ्यांचे मानसिक स्वास्थ्य जपले जाऊन त्यांचें उत्तम अध्ययन व्हावे या हेतूने राज्य मंडळाच्या सर्व शाळांमध्ये इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी "आनंददायी शनिवार" हा उपक्रम राबवण्यात येत आहे.

# वाकडमध्ये नवरात्र उत्सवात शाहीर चंद्रकांत माने यांचा "शाहिरी बाणा" अनुभवण्याची संधी!



**पिंपरी | प्रतिनिधी**

नवरात्राच्या पारंपरिक जल्लोषात यंदा वाकड परिसरातील नागरिकांना महाराष्ट्राच्या लोककलेचा अनोखा ठसा अनुभवायला मिळणार आहे. विशाल भाऊ वाकडकर सोशल फाउंडेशन तर्फे आयोजित नवरात्र दांडिया उत्सव 2025 मध्ये विशेष आकर्षण म्हणून युवा शाहीर चंद्रकांत माने यांचा "शाहिरी बाणा" हा थरारक लोककला कार्यक्रम गुरुवार, दि. 25 सप्टेंबर रोजी सायं. 7 वाजता द्रौपदा लॉन्स, कस्तुरी चौक, वाकड येथे रंगणार आहे.

शाहीर चंद्रकांत माने हे आपल्या दमदार आवाजासाठी, सामाजिक भान जपणाऱ्या आशयासाठी आणि ऊर्जावान सादरीकरणासाठी महाराष्ट्रभर परिचित आहेत. त्यांच्या आख्यानांमध्ये सामाजिक जाणीव, प्रेरणा आणि महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचा ठसा अनुभवायला मिळतो. त्यामुळे वाकडमधील हा कार्यक्रम स्थानिकांसाठी एक संस्मरणीय ठरणार आहे.

याचबरोबर नवरात्राच्या निमित्ताने पारंपरिक दांडिया व गरबा उत्सवाचाही नागरिकांना आस्वाद घेता येणार आहे.

**नागरिकांसाठी आवाहन :**

वाकड, पिंपरी चिंचवड परिसरातील नागरिकांनी या अद्वितीय कार्यक्रमाचा लाभ घ्यावा आणि कुटुंबासह उपस्थित राहून उत्सवाचा आनंद द्विगुणित करावा, असे आवाहन आयोजक विशाल भाऊ वाकडकर सोशल फाउंडेशन तर्फे करण्यात आले आहे.

# मावळ लोकसभा समन्वयकपदी निखिल काळकुटे



**पिंपरी | प्रतिनिधी**

देवाभाऊ फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य या संघटनेत मावळ लोकसभा समन्वयकपदी युवा नेते निखिल काळकुटे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांची निवडीबद्दल सर्वत्र शुभेच्छांचा वर्षाव सुरु आहे.

फाऊंडेशनचे मुख्य संस्थापक तथा समन्वयक गजानन जोशी आणि प्रदेश सह समन्वयक डॉ. आशुतोष घोलप यांनी निवडीचे पत्र युवा नेते निखिल काळकुटे यांना दिले आहे. यावेळी प्रदेश सहसमन्वयक प्रविण अलाई, प्रदेश सहसमन्वयक श्रीकांत थिटे, प्रदेश सहसमन्वयक विवेक देशकर, प्रदेश सहसमन्वयक वृंदा लाड, प्रदेश सहसमन्वयक ॲड.मंदार जोशी, प्रदेश कार्यकारिणी सदस्य राजू वाघ, प्रदेश कार्यकारिणी सदस्य राहूल राणे, प्रदेश कार्यकारिणी सदस्य दिपक कोलते, प्रदेश कार्यकारिणी सदस्य सिध्दार्थ कुलकर्णी उपस्थित होते.

**यावेळी पश्चिम महाराष्ट्र लोकसभा समन्वयक पदी**

विनीत बाजपाई पुणे समन्वयक

निखिल काळकुटे मावळ लोकसभा समन्वयक

संजय पाचंगे शिरूर लोकसभा समन्वयक

सुनील सामंत कोल्हापूर समन्वयक

ओंकार शुक्ल सांगली समन्वयक

अनुराग पानशेट्टी सोलापूर समन्वयक

सदाशिव नाईक सातारा समन्वयक

अण्णासाहेब कोळी माढा समन्वयक यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# आठ ‘ डबल डेकर’ बस शहरात धावणार!

## पुण्यात पीएमपी आठ डबल डेकर बस सेवा सुरू करणार असून, ट्रायल रन यशस्वी

**पुणे | प्रतिनिधी**

‘पुणे महानगर परिवहन महामंडल लिमिटेड (पीएमपी) कंपनी तोट्यात चालली आहे. कंपनी आर्थिकदृष्ट्या मजबूत करण्यासाठी बस मार्गांचे सुसूत्रीकरण, नवीन बसची खरेदी यासह इतर विषयांवर संचालक मंडळाच्या बैठकीत चर्चा झाली.

‘पीएमपी’च्या डेपोंचा व्यावसायिकदृष्ट्या विकास करण्यासाठी, उत्पन्न वाढविण्यासाठी राष्ट्रीय पातळीवरील सल्लागार नेमण्याबाबत बैठकीत सविस्तर चर्चा झाली,’ अशी माहिती ‘पीएमपी’चे संचालक आणि महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांनी दिली.

‘पीएमपीएमएल’ कंपनीच्या संचालक मंडळाची बैठक झाली. बैठकीनंतर महापालिका भवन येथे पत्रकारांशी बोलताना आयुक्त नवलकिशोर राम यांनी बैठकीत झालेल्या विविध विषयांची माहिती दिली. राम म्हणाले, ‘पीएमपी आर्थिक सक्षम झाल्याशिवाय उपाय नाही. यासाठी बसची संख्या वाढविण्याचा विषय चर्चेला आला. प्रवाशांच्या सोयीसाठी नव्याने एक हजार सीएनजी बस घेण्याचा विषय कार्यपत्रिकेवर होता. यामध्ये ‘टाटा’ आणि ‘अशोक लेलँड’ कंपनीच्या बस घेण्याबाबत चर्चा झाली.’

प्रवाशांच्या सोयीसाठी ‘‘पीएमपी’च्या ताफ्यात आठ डबल डेकर बस येणार आहेत. त्यांची ‘ ट्रायल रन ‘ देखील घेण्यात आली आहे. या डबल डेकर बस ज्या मार्गांवर धावणार त्या मार्गांवर झाडांच्या फांद्या, लटकणाऱ्या वायर यांसारखे अडथळे असू नयेत. हे अडथळे नसतील, असेच मार्ग डबल डेकर बससाठी निवडण्यात येणार आहेत. प्रायोगिक तत्त्वावर चार मार्गांवर आठ बसची चाचणी घेण्यात येईल. त्यानंतरच या बस सेवेत उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.




‘‘पीएमपी’च्या वतीने सध्या ज्या मार्गांवर सेवा पुरविली जाते, त्यांमध्ये सुसूत्रीकरण करणे आवश्यक आहे. काही मार्गांवर कमी उत्पन्न आणि प्रवासी संख्या मर्यादित असतानाही पीएमपी बस चालविल्या जातात. यासाठी चांगला सल्लागार नेमून, अभ्यास करण्याची आवश्यकता आहे.

मार्ग सुसूत्रीकरणाची सुरुवात महापालिकांच्या हद्दीपासून करून नंतर ग्रामीण भागावर लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे, यावर सर्व संचालक मंडळाचे एकमत झाले. ‘पीएमपी’च्या मालकीच्या अनेक जागा आहेत. दहा डेपो आहेत. त्या जागा मोकळ्या पडलेल्या आहेत. त्यांचा व्यावसायिकदृष्ट्या विकास करणे गरजेचे आहे. त्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.’ असेही महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी सांगितले.

# राज्यात सर्वाधिक महागडे पाणी खराडी आयटी पार्कमध्ये!

## हिंजवडी आयटी पार्कच्या चौपट दर; महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने उद्योगांसाठी पाणीपट्टीत वाढ

**पुणे | प्रतिनिधी**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) उद्योगांसाठी पाणीपट्टीत वाढ केली आहे. यात पुण्यातील खराडी आयटी पार्कमध्ये पाण्याचा दर राज्यात सर्वाधिक असल्याचे समोर आले आहे. खराडीनंतर बीड, मुंबई महानगर आणि पिंपरी-चिंचवडसह हिंजवडीतील राजीव गांधी इन्फोटेक पार्कमध्ये हा दर जास्त आहे.

‘एमआयडीसी’ने या महिन्यापासून पाणीपट्टीत वाढ केली आहे. महाराष्ट्र जलसंपत्ती प्राधिकरणाकडून सातत्याने वाढत असलेला पाणीदर आणि महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने केलेली दरवाढ यामुळे पाणीपट्टी वाढविण्याचे पाऊल उचलल्याचे ‘एमआयडीसी’चे म्हणणे आहे. ‘एमआयडीसी’कडून उद्योगांसाठी प्रत्येक औद्योगिक क्षेत्रानुसार पाण्याचा दर वेगवेगळा आकारला जातो. राज्यात खराडी आयटी



पार्कमध्ये सध्या प्रतिहजार लिटरसाठी सर्वाधिक १०२.७५ रुपये दर आहे. हा दर वाढून १०४.७५ रुपयांवर जाणार आहे. बीडमध्ये उद्योगांसाठी पाण्याचा दर आता प्रतिहजार लिटरला ३२.७५ रुपये झाला आहे. त्या खालोखाल मुंबई महानगर परिसरात २६ आणि पिंपरी-चिंचवड, चाकण, तळवडे आणि हिंजवडीत हा दर २४.२५ रुपये झाला आहे.

‘एमआयडीसी’कडून खराडी आयटी पार्कमध्ये पाणीपुरवठा करण्यासाठी महापालिकेच्या पाण्याचा वापर केला जातो. महापालिका ‘एमआयडीसी’ला व्यावसायिक दराने पाणीपट्टीची आकारणी करते. महापालिकेचा पाणीपट्टीचा व्यावसायिक दर प्रतिहजार लिटर ८८.३५ रुपये आहे. ‘एमआयडीसी’कडून खराडी आयटी पार्कमध्ये पाण्याची टाकी उभारण्यात आली आहे. तेथून जलवाहिन्यांतून हे पाणी ‘एमआयडीसी’ तेथील ग्राहकांना पुरवते. या ठिकाणच्या यंत्रणेची दुरुस्ती व देखभाल, विजेचा खर्च, कर्मचाऱ्यांवरील खर्च आणि सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाचा खर्च यांची आकारणी ‘एमआयडीसी’ पाणीपट्टीत करते. त्यामुळे खराडी आयटी पार्कमध्ये पाण्याचा दर आता प्रतिहजार लिटर १०४.७५ रुपयांवर जाणार आहे. या ठिकाणी दररोज सुमारे दीड लाख लिटर पाण्याची मागणी असते, अशी माहिती ‘एमआयडीसी’तील सूत्रांनी दिली.

> “ पुणे महापालिकेकडून घरगुती ग्राहक आणि व्यावसायिक अशी पाणीपट्टीची आकारणी केली जाते. खराडी आयटी पार्कमध्ये व्यावसायिक दराने ‘एमआयडीसी’ला पाणी दिले जाते. हा दर प्रतिहजार लिटर ८८.३५ रुपये आहे. जलसंपदा विभागाकडून आकारण्यात येत असलेल्या दरानुसार या दरांची आकारणी केली जाते.
>
> **- प्रसन्न राघव जोशी, कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग, महापालिका**

### परिपत्रकामुळे गोंधळ

**» ‘एमआयडीसी’ने पाणीपट्टीतील वाढीबाबत काढलेल्या पत्रकावरून गोंधळ निर्माण झाला आहे. या परिपत्रकात खराडी आयटी पार्कमधील पाण्याचा नवीन दर प्रतिहजार लिटर ४०.७५ रुपये नमूद करण्यात आला आहे. प्रत्यक्षात हा दर १०४.७५ रुपये असायला हवा होता. त्यामुळे आधीच्या परिपत्रकात सुधारणा करून नवीन दराचा समावेश करावा, यासाठी ‘एमआयडीसी’च्या मुख्यालयाकडे पुण्यातील कार्यालयाने प्रस्ताव पाठविला आहे. त्यामुळे लवकरच नवीन दर खराडी आयटी पार्कमध्ये लागू होतील, असे ‘एमआयडीसी’तील सूत्रांनी सांगितले.**

# पुण्यातील कात्रज प्राणिसंग्रहालयात इतके प्राणी!

## पर्यटकांची संख्याही लक्षणीय मात्र, प्राण्यांची संख्या कमी; आयुक्तांनीच दिली कबुली

**पुणे | प्रतिनिधी**

'कात्रज येथील महापालिकेच्या राजीव गांधी प्राणी संग्रहालयाचा परिसर मोठा आहे. या ठिकाणी येणाऱ्या पर्यटकांची संख्याही लक्षणीय आहे. मात्र, त्या तुलनेत येथे असलेल्या प्राण्यांची संख्या कमी आहे,' अशी कबुली महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी दिली.

या प्राणिसंग्रहालयाला भेट देण्यासाठी येणाऱ्या नागरिकांची यामुळे निराशा होत असल्याचेही ते म्हणाले. महापालिका आयुक्त राम यांनी महापालिकेच्या कात्रज येथील राजीव गांधी प्राणी संग्रहालयाला भेट देऊन तेथील सोयी-सुविधांची पाहणी केली. या पाहणीमध्ये आयुक्तांना येथे अनेक त्रुटी जाणवल्या. यामध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्याच्या सूचना त्यांनी उद्यान विभागासह प्राणी संग्रहालय प्रशासनाला दिल्या. त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याची तयारीदेखील दाखविण्यात आली आहे.

याबाबत अधिक माहिती देताना आयुक्त राम म्हणाले, 'पुण्यासारख्या मोठ्या शहरात प्राणी संग्रहालयात अधिक प्राणी असायला हवेत. महापालिकेच्या कात्रज येथील प्राणी संग्रहालयात प्राण्यांची संख्या तुलनेत कमी आहे. यामध्ये वाढ करण्याची गरज आहे.

प्राणी संग्रहालयाचा परिसर १३० एकरामध्ये पसरलेला आहे. सर्वांत मोठे नैसर्गिक पाण्याचे तळे येथे आहे. येथील उपलब्ध जागेचा अधिक चांगल्या प्रकारे उपयोग करून घेता येऊ शकतो. त्यासाठी काम केले पाहिजे. वेगवेगळ्या प्रकारचे प्राणी येथे आणायला हवेत. त्यांना आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याची आवश्यकता आहे. येथे मनुष्यबळदेखील कमी आहे. प्राणी संग्रहालयात आवश्यक असलेल्या सर्व विषयांवर प्रस्ताव पाठविण्याच्या सूचना संबंधितांना दिल्या असल्याचे आयुक्त नवल किशोर राम यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.




'महापालिकेच्या प्राणी संग्रहालयाला भेट देणाऱ्या नागरिकांना वाहने लावण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध होत नसल्याने अनेकदा रस्त्यावर वाहने उभी केली जातात. त्यामुळे वाहतूक कोंडी निर्माण होते. महापालिकेच्या वतीने उभारण्यात आलेल्या स्वागत कक्षामध्ये काही बदल करून पर्यटक चांगल्या पद्धतीने कसे आकर्षित होतील, यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे.

पुणे शहराची ओळख देशाच्या पातळीवर आहे. त्यामुळे येथील प्राणीसंग्रहालय देखील त्या पद्धतीने असले पाहिजे. यासाठी अधिकाधिक प्राणी आणण्याचा प्रयत्न यापुढील काळात महापालिकेचा असणार आहे. यासाठी आवश्यक असलेला निधी उपलब्ध करून दिला जाईल,' असेही आयुक्त राम यांनी स्पष्ट केले.

# एकवीरा माता देवी मंदिराच्या सभा मंडपासाठी 15 लाखांचा निधी

## सभा मंडप उभारण्यासाठी विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांची घोषणा

**पुणे | प्रतिनिधी**

एकवीरा देवी मंदिराच्या पायथ्याशी भाविकांसाठी सभा मंडप उभारण्यासाठी विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी त्यांच्या आमदार निधीतून १५ लाख रुपये देण्याची घोषणा केली. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून 'ना हरकत प्रमाणपत्र' मिळताच सभा मंडपाचे काम तातडीने सुरू करण्यात येईल, असे डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले.

एकवीरा मातेचे दर्शन घेतल्यानंतर परिसरातील सोयी सुविधांची पाहणी डॉ. गोऱ्हे यांनी केली, त्यावेळी त्यांनी ही घोषणा केली.डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, 'मावळ तालुक्यातील कार्ला परिसरातील प्राचीन आणि पवित्र एकविरा माता मंदिर असून, ते महाराष्ट्रातील महत्त्वाचे धार्मिक पर्यटन स्थळ आहे. या ठिकाणी येणाऱ्या भाविकांसाठी सोयीसुविधा आणि सुरक्षिततेसाठी प्रयत्न करण्यात येईल. या परिसरात येणाऱ्या भाविकांकरिता वाहनतळ, खड्डेमय रस्ते आणि भाविकांच्या सोयीशी निगडित विविध कामे प्रलंबित आहेत.

'पीएमआरडीए' व 'एमएमआरडीए'च्या वतीने कामे करण्यात येत असून, दोन्ही यंत्रांमध्ये समन्वय साधून ही कामे वेगाने पूर्ण होणे आवश्यक आहे. याबाबत दिवाळीनंतर विधान भवनात विशेष बैठक घेऊन संबंधित विभागांच्या प्रलंबित प्रश्नांवर निर्णय घेण्यात येईल.'



दरम्यान, 'नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर देवस्थानाच्या वतीने करण्यात आलेल्या तयारीचा आढावाही त्यांनी घेतला. पायरी मार्गावर रेलिंग बसविणे, मधमाशांच्या हल्ल्यापासून संरक्षण, लाकडी डोलीतून दर्शन घेणाऱ्या भक्तांची सुरक्षितता, आरोग्यसेवा सुविधा आणि पार्किंग समस्येचे निराकरण करण्यास प्राधान्य द्यावे,' अशी सूचना गोऱ्हे यांनी केली.